0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे दि. १९/०७/२०१२ रोजीच्या पत्रासोबत वरिष्ठ पोलिस निरिक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याणं यांचे पत्र व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४५/२०१२/जा.४९४, दिनांक २४/०७/२०१२.

३) सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ चा चालक मुकेश परबत पटेल, सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ च्या चालकाशेजारी बसलेला इसम भानु सुर्यनारायण अवस्थी व सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ चा मालक अमृत शंकर उडचणे यांचे दिनांक २१/०८/२०१२ रोजी नोंदविण्यात आलेले स्वतंत्र लेखी जबाब.

४) वरिष्ठ पोलिस निरीक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे यांचे दिनांक १७/०८/२०१२ व २७/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४५/२०१२/जा ७८९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ०९/११/२०१२.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २५/०४/२०१२ रोजी महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण येथे पोलिस नाईक/२५९६ सुरेश पांडुरंग रडे हे ड्युटी करीत असताना ०४:०० वाजताचे सुमारास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, संतोषी माता रोडने एका सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ मधून संशयीतरित्या केरोसिन घेऊन जात आहेत. अशी बातमी मिळाल्यावरुन लागलीच त्यांनी सदरची बातमी पोलिस निरिक्षक श्री. धनावडे यांना कळविले असता त्यांनी तात्काळ सहा.पोलिस निरिक्षक एच.एन. जाधव, पो.हवा/५३४ गायकवाड, पो.ना./३२२६ बोरसे, पोना./३९०२ एस.एस. पाटील, पो.ना./१८८३ एस.एस. कोळी, पो.कॉ./२७०२ बागुल असे पोलिस कर्मचारी यांना बोलावून त्यांना संतोषी माता रोड, ० नंबर गल्लीचे जवळ थांबवून ०४:२० वाजताचे सुमारास बातमीचा आशय समजावुन सांगत असताना अचानक वरील नमूद सँट्रो कार ही रोडने जात असताना दिसली. म्हणून लागलीच नमूद सँट्रो कार

चालकास इशारा करुन वाहन बाजूला घेण्यास सांगितले. त्यानुसार वाहन चालकाने वाहन बाजूला घेतले. नंतर लागलीच दोन पंचांना बोलावून घेऊन पंचांसमक्ष कार चालकास पंच व पोलिसांची ओळख करुन देऊन कार चालकास कारची झडती घेणार असलेबाबत कळवून त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव मुकेश परबत पटेल असे सांगितले. तसेच नमूद वाहनात वाहन चालकाशेजारी बसलेल्या इसमास त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव भानु सुर्यनारायणअवस्थी असे सांगितल्याने पंचांसमक्ष नमूद सँट्रो कारची झडती घेतली असता, पंचनाम्यात नमूद वर्णनाप्रमाणे माल मिळून आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | एक चॉकलेटी रंगाची सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ | १ नग | ३,५०,०००/- |
| २ | उक्त कारमध्ये वाहन चालकाचे पाठीमागील बाजूस प्लॉस्टिकचे ६ कॅनमध्ये प्रत्येकी ३५ लिटर निळे रंगाचे केरोसिन, ४ कॅनमध्ये प्रत्येकी ३० लिटर निळे रंगाचे केरोसिन, एका छोट्या कॅनमध्ये २० लिटर निळे रंगाचे केरोसिन व सँट्रो कारचे डिक्कीमध्ये ठेवलेल्या प्लॉस्टिकचे २ कॅनमध्ये प्रत्येकी ३५ लिटर निळे रंगाचे केरोसिन, कॅनसह किंमत सुमारे | ४२० लिटर | ५,६७०/- |
| | | एकूण | ३,५५,६७०/- |

नमूद दोन्ही इसमांना पुढील चौकशी कामी ताब्यात घेऊन महात्मा फुले चौक पोलिस ठाणे येथे येऊन ठाणे दैनंदिनी तशी नोंद क्रमांक १५/०६.१५ वाजता नुसार घेण्यात आली आहे. पोलिस ठाणे येथे आले नंतर वाहन चालकाचे सोबत असलेल्या इसमास व वाहन चालकाकडे विचारपुस करता त्याने सदरचे केरोसिन हे शिधा[illegible] दुकान क्र. ३८ फ १९५ या दुकानातील असलेचे व केरोसिन हे तळोजा येथे ट्रक चालकास देणार असल्याचे सांगितले आहे.

अशाप्रकारे दिनांक २५/०४/२०१२ रोजी ०४:२० वाजताचे सुमारास संतोषी माता रोड, ० नंबर [illegible] जवळ कल्याण पश्चिम येथून इसम नामे १) मुकेश परबत पटेल, २) भानु सुर्यनारायण अवस्थी यांनी आपसात संगनमत करुन शिधावाटपधारकांना शिधापत्रिकेवर रास्त भावाने विक्रीसाठी राखुन ठेवलेले निळे रंगाचे केरोसिन हे जीवनावश्यक वस्तू आहे हे माहित असताना सुध्दा विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी काळ्या बाजाराने विक्री करणेसाठी ४२० लिटर केरोसिन सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ मधून वाहतूक करुन घेऊन जात असताना मिळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांनी, १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७, २) भा.दं.वि.सं. कलम २८५ तसेच ३) मोटार वाहन कायदा कलम १९२, ५०/१७७ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण

येथे गुन्हा नोंद क्र. III ४५/२०१२, दिनांक २५/०४/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण यांनी वाचावे क्र. १ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २१/०८/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ चा चालक मुकेश परबत पटेल, सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ च्या चालकाशेजारी बसलेला इसम भानु सुर्यनारायण अवस्थी व सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ चा मालक अमृत शंकर उडचणे हे उपस्थित राहिले. परंतू त्यांनी लेखी निवेदन सादर केले नाही. तथापी, सुनावणी दरम्यान सँट्रो कार चा चालक मुकेश परबत पटेल यांनी गुन्हा कबुल करुन निळे केरोसिनचा साठा हा अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८ फ १९५ या दुकानातून रुपये ३०/- प्रति लिटर प्रमाणे अवैधरित्या खरेदी केल्याचे सांगून सदर साठा गैरमार्गाने तळोजा येथे विक्री करणार असल्याचे सांगितले. भानु सुर्यनारायण अवस्थी यांनी सदर रेशन दुकान क्र. ३८ फ १९५ हे त्याच्या भावाच्या नावावर असल्याचे सांगून सदरचा निळे केरोसिनचा साठा हा त्यांनी अवैधमार्गाने रुपये ३०/- प्रति लिटर प्रमाणे मुकेश परबत पटेल याला विक्री केल्याचे कबुल केले. तसेच अमृत शंकर उडचणे यांनी दिलेल्या जबाबात सदरचे सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ ही त्यांच्या मालकीचे असल्याचे सांगुन त्यांनी सदर गाडी मुकेश परबत पटेल यांना दिल्याचे कबुल केले आहे. सदर सुनावणीस उपस्थित तिन्ही इसमांचा वाचावे क्र. ३ अन्वये लेखी जबाब नोंदविण्यात आला आहे. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ३८ फ १९५ चे प्राधिकारपत्रधारक हे उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## <u>युक्तिवाद</u> :-

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ चा चालक मुकेश परबत पटेल यांनी दिलेल्या लेखी जबाबात, दिनांक २५/०४/२०१२ रोजी त्याचे मित्र श्री. अमृत शंकर उडचणे, राहणार घनसोली गांव, गुणाळे तलावाजवळ, युवराज मढवी चाळ, नवी मुंबई याचेकडून त्यांची सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ घेऊन त्यामध्ये ४२० लिटर निळे रंगाचे केरोसिन अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८

फ १९८ मधून काळ्या बाजाराने खरेदी करुन कॅनमध्ये घेऊन तळोजा येथे जात असताना महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण यांनी पकडली. सदर निळ्या रंगाच्या केरोसिनचा साठा त्याने भानू सूर्यनारायण अवस्थी याचेकडून अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८ फ १९५ मधून रुपये ३०/- प्रति लिटर या दराने घेतलेला आहे. तो सन १९९९ ते २०१२ पर्यंत श्री. लखन पटेल यांच्या अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८ फ १९४ मध्ये लेखनिक पदावर काम करीत होता. सध्या तो एस.बी. एन्टरप्रायझेस, डोंबिवली येथे काम करीत आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ चा मालक अमृत शंकर उडचणे यांनी दिलेल्या लेखी जबाबात, दिनांक २५/०४/२०१२ रोजी संबंधित पोलिस ठाणे यांनी जप्त केलेली सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ ही त्याच्या मालकीची असून ती तो दिनांक २३/०४/२०१२ रोजी त्याचे मित्र श्री. मुकेश परबत पटेल, राहणार सुमन सिटी अपार्टमेंट, गणेश विंग, पहिला माळा, ब्लॉक क्र १०३, बिर्ला कॅालेजजवळ, कल्याण (पश्चिम) यांना शिर्डी येथे जाण्यासाठी दोन दिवसांकरिता दिली होती. सदर गाडीचा त्याने जो दुरुपयोग केला आहे त्याबाबत त्याला काहीही माहित नाही. तसेच त्या कृत्याशी त्याचा काही संबंध नाही. अधिकाऱ्यांनी नोकरीबाबत विचारणा केली असता, तो टेम्पोवर चालकाची नोकरी करीत असून टेम्पो क्रमांक त्यास माहिती नाही; असे नमूद केले आहे.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित भानु सुर्यनारायण अवस्थी यांनी दिलेल्या लेखी जबाबात, दिनांक २५/०४/२०१२ रोजी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८ फ १९५ या दुकानामधून ४२० लिटर निळ्या रंगाचे केरोसिन १२ कॅनमधून भरुन ते त्याचे मित्र श्री. मुकेश परबत पटेल यांना काळ्या बाजारातून विक्री करण्यासाठी देण्यात आले होते. सदरचे निळे केरोसिन त्यांना अवैधरित्या रुपये ३०/- प्रति लिटर या दराने एकूण ४२० लिटर निळे रंगाचे केरोसिनचे एकूण रक्कम रुपये १२,६००/- एवढी श्री. मुकेश परबत पटेल यांनी त्याला दिलेली आहे. सदरचा गुन्हा त्याला कबूल असून त्याच्या अज्ञानपणामुळे तो त्याच्याकडून घडलेला आहे, असे नमूद केले आहे.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे यांचे दिनांक १७/०८/२०१२ व २७/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, आरोपीत नामे १) मुकेश परबत पटेल, २) भानु सुर्यनारायण अवस्थी, ३) सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ चा मालक अमृत शंकर उडचणे व ४) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८ फ १९५ चे प्राधिकारपत्रधारक भानु सुर्यनारायण अवस्थी यांना वरील गुन्ह्याचे कामी नोटीसची बजावणी करणे कामी आपले कारणे दाखवा नोटीस अन्वये कळविण्यात आले होते, असे नमूद केले आहे.

CONTROLLER OF RATIONING & DI... HEAD OFF... MUMBA...

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे जबाब, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

दिनांक २५/०४/२०१२ रोजी महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण येथील पोलिस पथकाने संतोषी माता रोडने एका सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ मधून संशयीतरित्या केरोसिन घेऊन जात असल्याची बातमी मिळाल्यावरुन संतोषी माता रोड, ० नंबर गल्लीचे जवळ थांबवून ०४:२० वाजताचे सुमारास पंचांसमक्ष नमूद सँट्रो कार चालकास इशारा करुन वाहन बाजूला घेण्यास सांगितले. त्यानुसार वाहन चालकाने वाहन बाजूला घेतले. पंचांसमक्ष कार चालकास पंच व पोलिसांची ओळख करुन देऊन कार चालकास कारची झडती घेणार असलेबाबत कळवून त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव मुकेश परबत पटेल असे सांगितले. तसेच नमूद वाहनात वाहन चालकाशेजारी बसलेल्या इसमास त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव भानु सुर्यनारायणअवस्थी असे सांगितल्याने पंचांसमक्ष नमूद सँट्रो कारची झडती घेतली असता, पंचनाम्यात नमूद वर्णनाप्रमाणे माल मिळून आला. पोलिसांनी नमुद गाडीत व दोन्ही इसमांस ताब्यात घेऊन त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता सदरचे निळे केरोसीन हे शिधावाटप दुकान क्रमांक ३८ फ १९५ या दुकानातील असल्याचे व केरोसीन हे तळोजा येथे ट्रक चालकास अवैध विक्री करणार असल्याचे कबुल केल्याने संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन एकुण रु. ३,५५,६७०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित सॅन्ट्रो कार एमएच-०४-बीडी-१०७३ चे चालक मुकेश परबत पटेल यांनी दिलेल्या लेखी जबाबात, जप्त करण्यात आलेला निळे केरोसीनचा साठा त्यांनी शिधावाटप दुकान क्रमांक ३८ फ १९५ मधुन भानु सुर्यनारायण अवस्थी यांचेकडून रु. ३०/- प्रतिलिटर प्रमाणे अवैधरित्या खरेदी करुन तो काळयाबाजाराने विक्री करण्याकरीता तळोजा येथे घेऊन जात असल्याचे कबुल केले. तसेच घटनास्थळी त्याच्या शेजारी बसलेला इसम नामे भानु सुर्यनारायण अवस्थी याने सदरची बाब मान्य करुन त्याने शिधावाटप दुकान क्रमांक ३८ फ १९५ मधुन सदरचा निळे केरोसीनचा साठा हा मुकेश परबत पटेल यास रु. ३०/- प्रतिलिटर प्रमाणे अवैध विक्री केल्याचे कबुल करुन तसा लेखी जबाब दिलेला आहे. सदर प्रकरणी शिधावाटप दुकान क्रमांक ३८ फ १९५ चे प्राधिकारपत्रधारक यांना सुनावणीस पाचारण करुनही उपस्थित राहीले नाहीत. ही अत्यंत गंभीर बाब आहे. वास्तविक पहाता शासनाने प्राधिकारपत्रधारक म्हणुन नेमणुक करुन त्यांच्या दुकानास संलग्न असलेल्या शिधापत्रिकाधारकास शासन नियंत्रीत दराचे निळे केरोसीन व इतर शिधाजिन्नस वितरण करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली असता सदर प्राधिकारपत्रधारकाने शासन नियंत्रीत दराचा निळे केरोसीनचा साठा हा गोरगरीब पात्र शिधापत्रिकाधारकांना वंचीत ठेवून त्यांना देय असलेला केरोसीनचा साठा हा काळयाबाजाराने विक्री केल्याचे सिध्द होत असल्याने अधिकृत शिधावाटप दुकान क्र ३८ फ १९५ चे प्राधिकारपत्रधारक यांनी शासनाची विश्वासार्हता गमावल्याचे दिसुन येते. सदर गुन्हा नोंद प्रकरणी वरील नमुद आरोपी यांनी संगनमताने शासन नियंत्रीत निळे केरोसिनची अवैधमार्गाने व अनधिकृतरित्या खरेदी - विक्री करुन,

त्याची बेकायदेशीररित्या वाहतुक करीत असल्याचे सिध्द होत आहे. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

जप्त सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ चा मालक अमृत शंकर उडचणे यांनी दिलेल्या लेखी जबाबात, दिनांक २३/०४/२०१२ रोजी सदर कार त्याचे मित्र श्री. मुकेश परबत पटेल यांना शिर्डी येथे जाण्यासाठी दोन दिवसांकरिता दिली होती. सदर गाडीचा त्याने जो दुरुपयोग केला आहे त्याबाबत त्याला काहीही माहित नाही. तसेच त्या कृत्याशी त्याचा काही संबंध नाही. अधिकाऱ्यांनी नोकरीबाबत विचारणा केली असता, तो टेम्पोवर चालकाची नोकरी करीत असून टेम्पो क्रमांक त्यास माहिती नाही, असे मोघम स्वरुपाचा व दिशाभुल करणारा लेखी जबाब दिला आहे. सदर सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ चा वापर नमुद गुन्हा नोंद प्रकरणी शासन नियंत्रीत दराचे निळे केरोसीनची अवैध वाहतुक व विक्री करण्यासाठी केला असल्याचे सिध्द होत आहे. सदर गैरकृत्यास अप्रत्यक्षरित्या सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ चा मालक हा ही जबाबदार असल्याने त्याने उपभोक्ता तसेच पर्यायाने शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. प्रस्तुत प्रकरणी जप्त सँट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ च्या मालकाच्या अपरोक्ष जरी आरोपी यांनी त्याच्या वाहनाचा गैरवापर केला असला तरी वाहन मालक या नात्याने त्याने त्याच्या वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर कारच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास कारचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरची कार त्याच्या मालकास परत करण्याचा अथवा कारचा मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरची कार जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये महात्मा [illegible] चौक पोलिस ठाणे, कल्याण येथे गुन्हा नोंद क्र. II ४५/२०१२, दिनांक २५/०४/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD ... MUMB...

## आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेले संपुर्ण एकूण ४२० लिटर निळे केरोसिनचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेले सदरचे निळे केरोसिन उपनियंत्रक शिधावाटप, फ-परिमंडळ कार्यालय, ठाणे यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांस, पोलीसांनी नियंत्रीत दराने विक्री करुन येणारी रक्कम पोलीसांनी शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेली सॅंट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ ही शासनजमा करण्यात येत आहे. सदर वाहनाच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास वाहनाचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्याच्या मालकास परत करण्यात यावेत व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

४) अथवा वाहनाचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास सदर वाहनाची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहन लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

५) जप्त करण्यात आलेले १३ प्लॅस्टिक कॅन यांची पोलीसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) सॅंट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ चा चालक मुकेश परबत पटेल
२) सॅंट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ च्या चालकाशेजारी बसलेला इसम भानु सुर्यनारायण अवस्थी
३) सॅंट्रो कार क्र. एमएच-०४-बीडी-१०७३ चा मालक
४) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८ फ १९५ चे प्राधिकारपत्रधारक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. ६, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

~~५)~~ निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.